AUG 1995

(1418)

Ward No. 9138

राज्य गुन्हा अन्वेषण विभाग [गुन्हे], महाराष्ट्र राज्य, पुणे येथील अधिकाऱ्यांना एक टप्पा पदोन्नती देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
गृह विभाग,
शासन निर्णय, क्रमांक: संकीर्ण ०३९०/सीआर ४२६/पोल-५अ,
मंत्रालय, मुंबई : ४०० ०३२, दिनांक १४ ऑगस्ट, १९९५.

वाचा :- पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक: २५/८२१४/एक टप्पा पदोन्नती/धा.यो./१९९१-९२, दिनांक १३.११.१९९०

प्रस्ता :- राज्य गुन्हा अन्वेषण विभाग [गुन्हे], महाराष्ट्र राज्य, पुणे येथे काम करणाऱ्या कर्मचारी / अधिकाऱ्यांना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीकोनातून राज्य गुन्हा अन्वेषण विभाग [गुन्हे], पुणे येथील खालील कर्मचारी/ अधिकाऱ्यांना ते ह्या विभागात असे पर्यन्त [illegible] एक टप्प्याने पदोन्नती देण्यास शासन मंजुरी देण्यात येत आहे. हे आदेश सदर शासन निर्णय, दिनांक १ जुलै, १९९५ पासून अंमलात आणण्यात येतील.

अ.क्र.	सध्याचे पद	पदांची संख्या	एकटप्पा पदोन्नतीने मिळालेले पद.	पदांची संख्या	वेतनश्रेणी
१.	२.	३.	४.	५.	६.
१.	उपपोलीस अधिक्षक	१८	अप्पर पोलीस अधिक्षक	१८	रु. ३०००-४५००
२.	पोलीस निरीक्षक	६५	पोलीस उप अधिक्षक	६५	रु. २२००-३५००
३.	पोलीस उपनिरीक्षक	७४	पोलीस निरीक्षक	७४	रु. १६४०-२९०० 2200-3
४.	सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक	७	पोलीस उपनिरीक्षक	७	रु. १४००-२३०० 1640-2

२. अप्पर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हा अन्वेषण विभाग [गुन्हे], महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या आस्थापनेवर उपरोक्त परिच्छेद १ मध्ये उल्लेखिलेली पदे खालील पद्धतीने भरण्यात यावीत.

[अ] अप्पर पोलीस अधिक्षक ते पोलीस निरीक्षक ही पदे राज्य गुन्हा अन्वेषण विभाग [गुन्हे] यांच्या आस्थापनेवरील अधिकाऱ्यांमधूनच एक टप्पा पदोन्नतीने त्यांच्या राज्य गुन्हा अन्वेषण [गुन्हे] विभागातील काम करण्यास योग्यतेबाबत विचार करून भरण्यात यावीत.

[ब] ज्या अधिकाऱ्यांना एक टप्पा पदोन्नती देण्यात येणार नाही त्यांना त्यांच्या मूळ संवर्गात बदलून जाण्याचा विकल्प देण्यात यावा.

[क] राज्य गुन्हे अन्वेषण [गुन्हे] विभागातील अप्पर पोलीस अधिक्षक ते [illegible]
[illegible] या दर्जाची रिक्त पदे पोलीस दलातील (Executive Branches)
[illegible] पदावरून देण्यात यावीत.

[illegible]

३. वरील परिच्छेद ३ प्रमाणे देण्यात आलेली एक टप्पा पदोन्नतीची सुविधा त्या संबंधित अधिकाऱ्यास राज्य गुन्हा अन्वेषण विभागामध्ये काम करीत असेपर्यन्तच मिळेल आणि ज्यावेळी एखाद्या अधिकाऱ्यास त्याच्या मूळ संवर्गात बदली होईपर्यन्त ही अनपेक्षीत बढती [Fortuitipus Promotion] म्हणून समजण्यात येईल.

४. राज्य गुन्हे अन्वेषण विभागामधील एक टप्पा पदोन्नतीने मिळालेल्या अधिकाऱ्यांना त्या पदाची उच्चश्रेणी व त्याशिवाय ते यापूर्वी जे विशेष वेतन आणि इतर भत्ते उदा. घरभाडेभत्ता, गणवेश भत्ता, स्थानिक पुरक भत्ता इत्यादी सवलती ते घेत होते त्या त्यांना मिळतील.

५. एक टप्पा पदोन्नतीमुळे होणारा खर्च "२०५५ पोलीस १०१-गुन्हा अन्वेषण व दक्षता १०१ [दोन] गुन्हा अन्वेषण विभाग मुफस्सल" या लेखाशिर्षाखाली दर्शविण्यात यावा आणि प्रथमत: हा खर्च आकस्मिकता निधीतून मंजूर करण्यात आलेल्या शासन ज्ञापन, वित्त विभाग, क्र.आकनि ११९५/०५७ अर्थसंकल्प-१०, दिनांक १४ ऑगस्ट, १९९५ संगणक सांकेतांक ८०००-०५७-१ रु.१२,००,०००/ [बारा लाख फक्त] अग्रीमातून भागविण्यात यावी. सदर अग्रिमाची रक्कम जुलै ९५ ते डिसेंबर ९५ या सहा महिन्यासाठी असून ही रक्कम व उर्वरित कालावधीसाठी लागणारी रु. ६.६६ लाखाची रक्कम अशी एकूण रु. १८.६५ लाख रकमेची पुरवणी मागणी हिवाळी अधिवेशनात विधानमंडळास सादर करुन परिपूर्ती करण्यात येईल.

६. अप्पर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हा अन्वेषण विभाग [गुन्हे], पुणे यांनी आकस्मिकता निधीतून खर्च करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडे रक्कम सुपूर्द करण्यासंबंधीच्या आदेशामध्ये पृपत्रात आगाऊ रकमेतून खर्च करतांना सादर करण्यात येणाऱ्या शासन ज्ञापन, वित्त विभाग, क्र. आकनि ११९५/०५७ अर्थसंकल्प १०, दिनांक १४.८.९५ अन्वये मंजूर असे लिहावे अशी स्पष्ट सूचना त्या आदेशामध्ये / प्रपत्रात अंतर्भूत करावी व ही सूचना संपूर्ण लाल शाईने अधोरेखित करावी. मंजूर करण्यात आलेल्या अग्रिमाचा संपूर्ण विनियोग दिनांक ३१.१२.१९९५ पूर्वी करणे आवश्यक आहे. केलेल्या विनियोगाचे विवरण दिनांक ५.१.१९९६ पूर्वी न चुकता शासनास सादर करावे.

७. अप्पर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हा अन्वेषण विभाग [गुन्हे], पुणे यांनी आकस्मिकता निधी नियम सहा, आठ, आणि बारामध्ये असलेल्या तरतुदींचे काटेकोरपणे पालन करुन, गृह विभाग, वित्त विभाग, आणि महालेखापाल यांचेकडे आकस्मिकता निधी खर्च केलेल्या रकमेचा अहवाल सादर करावा. या संबंधात पोलीस महासंचालक यांचे लक्ष परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक : १५७३/दोन/१३१२[दोन]/क-२, दिनांक ८.३., १९७[illegible] मधील सूचनांकडे वेधण्यात येत आहे.

८. वित्त विभागाच्या उपरोक्त ज्ञापनाद्वारे मंजूर करण्यात आलेला आकस्मिकता निधी तसेच संगणक कोड क्रमांक संबंधित आहरण व वितरण अधिकारी यांच्या निदर्शनास आणावा आणि यासाठीचा खर्च आकस्मिकता निधीमध्ये विनयुक्त दर्शविण्यात येईल याची दक्षता घ्यावी.

.....

९. एक टप्पा पदोन्नतीची अंमलबजावणी दिनांक १ जुलै, १९९५ पासून करण्यात यावी.

१०. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने आणि त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक: ७७२/९५/व्यय-७, दिनांक १८.७.१९९५ यास अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

[कृ. द. हि. सय्यद]
उप सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग.

प्रति,

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अप्पर पोलीस महासंचालक, गुन्हा अन्वेषण विभाग [गुन्हे], पुणे.
सर्व पोलीस आयुक्त,
सर्व पोलीस उपमहानिरीक्षक.
सर्व पोलीस अधिक्षक.
महालेखापाल-१, महाराष्ट्र, मुंबई.
कोषागार अधिकारी, पुणे.
वित्त विभाग, व्यय-७ व अर्थसंकल्प-१०,
निवड नस्ती.